# District Court Recruitment 2023/
# जिल्हा न्यायालय भरती प्रक्रिया २०२३
# लघुवाद न्यायालय, मुंबई

## पद –कनिष्ठ लिपीक (Junior Clerk)

## उमेदवारांसाठी महत्वाची सुचना

उमेदवारांचे लक्ष माननीय उच्च न्यायालयाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध झालेल्या दि.४/१२/२०२३ च्या जाहिरातीमधील, "सर्व उमेदवारांसाठी सामाईक सुचना" या सदराखाली असलेल्या मुद्दा क्र.५ (Point No.5) च्या उपमुद्दा ग याद्वारे निर्देशित केलेल्या सुचनांप्रमाणे प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकीत प्रती व अर्ज केलेल्या पदानुसार त्यांच्या मूळ प्रती पडताळणीच्या उद्देशाने मुलाखतीच्या वेळेस घेवून उपस्थित राहावे. सदर सुचनांच्या बाबतीत कुठल्याही प्रकारची सबब विचारात घेतली जाणार नाही.

मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याची वेळ : सकाळी ८:४५ वाजता

मुलाखती दिनांक १६/११/२०२४ आणि १७/११/२०२४
(जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार )

-- ठिकाण --
लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग,
धोबी तलाव, मुंबई, ४०० ००२

NShahir

( निलम योगेश शाहिर )
प्रबंधक
१४/११/२०२४

# जिल्हा न्यायालय भरती २०२३

## लघुवाद न्यायालय, मुंबई

## पद : कनिष्ठ लिपीक (Junior Clerk)

## कनिष्ठ लिपीक पदाचे मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांसाठी कागदपत्रांच्या बाबतीत सुचना

कनिष्ठ लिपीक पदाचे मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांनी दिनांक ०४/१२/२०२३ रोजीच्या जाहिरातीत नमूद अ.क्र. ५ प्रमाणे **(ऑनलाईन सादर केलेल्या अर्जातील क्रमानुसार)** खालील प्रमाणपत्रांच्या **स्वसाक्षांकीत प्रती (Self Attested Copies) खालील क्रमाने एकत्रित (Organised) करुन** सादर करणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्या मूळ प्रती त्याच क्रमाने सादर कराव्यात.

१) **ओळखपत्र** जसे पॅनकार्ड/आधारकार्ड/वाहनचालकपरवाना/मतदानकार्ड इ.

२) **जन्मतारखेचा दाखला** किंवा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला / जन्म दाखला / माध्यमिक शाळा प्रमाणपत्र).

३) **राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र** (Domicile Certificate)

४) शासनाने विहित केलेल्या प्राधिकाऱ्याकडून निर्गमित केलेला **जातीचा दाखला** लागू असल्यास

५) पात्रतेच्या निकषात नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठ/संस्थेने जारी केलेले **संगणक (MS-CIT etc)** संचालनातील विहित ज्ञानाविषयीचे प्रमाणपत्र.

६) पात्रता निकषात नमूद केल्याप्रमाणे शासकीय परीक्षा ब्युरो, महाराष्ट्र राज्य किंवा शासकीय मंडळ किंवा आय.टी.आय. ने जारी केलेले **इंग्रजी व मराठी शॉर्टहॅंड/टायपिंग**मधील आवश्यक गतीचे प्रमाणपत्र.

७) १० वी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व गुणपत्रिका
१२ वी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व गुणपत्रिका
पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व गुणपत्रिका
पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व गुणपत्रिका

८) **दोन** सन्माननीय व्यक्तींनी दिलेली **चारित्र्य प्रमाणपत्रे**, त्यांचे नाव, पदनाम आणि पूर्ण टपाल पत्त्यासह, जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेस किंवा नंतर दिलेले, उमेदवाराचे नैतिक चारित्र्य चांगले असल्याचे प्रमाणित करणारे, या जाहिराती बरोबर दिलेल्या विहित नमुन्यात दिलेले

९) उमेदवार राज्य/केंद्र सरकारच्या सेवेत असल्यास संबंधित विभागाकडून **"ना हरकत प्रमाणपत्र"**

१०) **अनुभव** प्रमाणपत्र / प्रमाणपत्रे, असल्यास

११) विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत, जर तिने लग्नानंतर आपले नाव बदलले असेल तर तिचे नाव बदलण्या संदर्भातील कागदपत्रे, जसे की **शासकीय राजपत्र /सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्रांची प्रत इत्यादी**

१२) इतर कोणतीही कागदपत्रे, जर जिल्हा न्यायालय आस्थापनेने मागितल्यास

(निलम योगेश शाहिर)
प्रबंधक
लघुवाद न्यायालय, मुंबई
१४/११/२०२४